महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २३२ वा | दिनांक : १०/०७/२०२५ | वार : गुरूवार

# विनाअनुदानित शिक्षकांच्या आंदोलनाला अखेर यश



**मुंबई** : मुंबईतील आझाद मैदानात गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या विनाअनुदानित शिक्षकांच्या आंदोलनाला अखेर यश मिळाले आहे. शिक्षकांच्या विविध मागण्यांवर तोडगा काढत भाजप नेते आणि राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी आज सरकारनचे प्रतिनिधी म्हणून आंदोलनस्थळी भेट दिली आणि सरकारतर्फे सर्व मागण्या मान्य करण्याची घोषणा केली. तसेच अधिवेशन संपल्यानंतर खात्यात पैसे पडतील, असे महाजन यांनी सांगितले.

राज्यातील सुमारे ५,००० खासगी विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने शासकीय अनुदान देण्याचा निर्णय ऑक्टोबर २०२४ मधील विधानमंडळ अधिवेशनात घेण्यात आला होता. मात्र, त्या निर्णयाला आता दहा महिने उलटूनही प्रत्यक्ष निधीच्या तरतुदीचा कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे या शाळांमधील शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, सरकारच्या दिरंगाईविरोधात आता आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला होता. गेल्या पाच दिवसांपासून मुंबईतील आझाद मैदानात हे आंदोलन सुरू होते.

गिरीश महाजन म्हणाले की, आमची भूमिका सकारात्मक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सरकारला तुमची काळजी आहे. आम्हाला माहिती आहे की, आपण सामान्य कुटुंबातील आहात. तुमची रोजीरोटी ही आहे, त्यामुळे अतिशय धाडसी निर्णय फडणवीसांनी त्यावेळी घेतला. त्यानुसार, २० टक्के, ४० टक्के त्यानंतर ६० टक्के दिले.

सरकारी तिजोरीवरील आर्थिक संकटामुळे आमच्याकडून पुढचे टप्पे देण्यास उशीर झालेला आहे. तुम्ही याबाबत वारंवार मागणी करत होता. पण आता तुमचा पगारा प्रश्न मार्गी लागलेला आहे. आम्हाला तुमच्या खात्यात पगार टाकायचाच आहे, असे गिरीश महाजन म्हणाले.

याबाबत तुमच्या शिक्षकांच्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत ठरले आहे. पण या दोन-तीन दिवसात सर्व तांत्रिक बाजू समजावून घेऊन येत्या १८ तारखेला अधिवेशन संपेल तेव्हा तुमच्या खात्यात पैसे पडलेले असतील. यात कोणताही बदल होणार नाही, अशी ग्वाही गिरीश महाजन यांनी आंदोलक विनाअनुदानित शिक्षकांना दिली.

# ठाकरे बंधू एकत्र, मग मविआचे काय? : फुटणार की अबाधित राहणार? पृथ्वीराज चव्हाण

**मुंबई** : ठाकरे बंधू एकत्र येत असतील तर त्यांचे स्वागतच आहे. आगामी निवडणुका ते एकत्र लढणार असतील तर त्याचेही स्वागत आहे, पण यामुळे एक पक्ष कमी होईल, असे सूचक विधान महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा ज्येष्ठ काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केले आहे. चव्हाण यांच्या या विधानामुळे ठाकरे बंधूंनी आगामी निवडणुका एकत्र लढण्याची घोषणा केली, तर महाविकास आघाडी फुटणार? असे मानले जात आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मराठीच्या मुद्यावर एकत्र येण्याची घोषणा केली आहे. आता हे दोन्ही बंधू आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक विशेषतः मुंबई महापालिकेची निवडणूक एकत्र लढतील असा दावा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर पृथ्वीराज चव्हाण यांनी उपरोक्त विधान केले आहे. ते बुधवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, राजकीयदृष्ट्या वेगळे झालेले दोन भाऊ पुन्हा एकत्र येत असतील तर त्यांचे स्वागत आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ते एकत्र लढणार असतील तर ही सुद्धा चांगली बाब आहे. एक पक्ष कमी होईल.

पण त्यांचा हा निर्णय केवळ एका निवडणुकीपुरता असेल तर पुढे काय होईल हे माहिती नाही. भविष्यात दोन्ही पक्ष एकमेकांत विलीन होतील का? हा प्रश्न आहे. ठाकरे बंधूंचे पक्ष एकमेकांत विलीन झाले, तर त्याचे नेतृत्व कोण करणार? याविषयी जनतेला उत्सुकता आहे. विजयी मेळावा घेणे, त्यासाठी एकत्र येणे चुकीचे नाही. पण कोणत्याही पद्धतीच्या मारहाणीला आमचे समर्थन नाही. ही अत्यंत चुकीची गोष्ट आहे. महाराष्ट्राची एक परंपरा आहे. ती भंग होईल अशा कोणत्याही गोष्टीला आमचा पाठिंबा नसेल.

पृथ्वीराज चव्हाण पुढे म्हणाले की, काँग्रेस पक्षाची भूमिका अशी आहे की आमची आघाडी इंडिया आघाडीतील घटक पक्षांसोबत आहे. यात उद्धव ठाकरे व शरद पवारांच्या पक्षांचा समावेश आहे. त्यांना इतर कोणत्याही पक्षासोबत किंवा समान विचारसरणीच्या पक्षाशी युती करायची असेल तर तो त्यांचा मुद्दा आहे. पण आघाडीतील घटकपक्षांना काँग्रेसच्या विचारसरणीला, धर्मनिरपेक्षतेच्या विचारसरणीला व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात नमूद केलेल्या विचारसरणीला मुलभूतपणे विरोध करणाऱ्या लोकांसोबत युती करायची असेल तर ते आम्ही स्वीकारणार नाही.

काँग्रेस पक्षाने यापूर्वी अनेकदा स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक स्वबळावर लढवली आहे. त्यामुळे पक्षाने मुंबई, पुणे व नागपूर महापालिकेची निवडणूक स्वतंत्रपणे लढवण्याचा निर्णय घेतला तर मला आश्चर्य वाटणार नाही, असेही पृथ्वीराज चव्हाण यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

दरम्यान, काँग्रेससह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने लोकसभा व विधानसभेची निवडणूक एकत्र लढली होती. पण आता ठाकरे गटाने मनसेशी सूर जुळवण्याचे संकेत दिल्यामुळे महाविकास आघाडीचे भवितव्य अधांतरी असल्याचा दावा केला जात आहे.

# अल्पमतातील सरकार चालते, पण विरोधीपक्ष नेतेपदासाठी अडवणूक होते : उद्धव ठाकरे



**मुंबई** : "आपल्या देशात अल्पमतातील सरकारे चालवली जातात, पण विरोधीपक्ष नेतेपदासाठी मात्र अडवणूक केली जाते, हे लोकशाहीच्या मूळ तत्त्वांनाच आव्हान देणारे आहे," अशा कठोर शब्दांत उद्धव ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर घणाघाती टीका केली. "विरोधीपक्ष नेते पद हा सुदृढ लोकशाहीतील एक अत्यावश्यक घटक आहे. मस्तवालपणे वागणाऱ्या लोकप्रतिनिधींवर अंकुश ठेवण्यासाठी विरोधीपक्ष नेते हवा असतो. त्यामुळे केवळ संख्याबळाचा आधार घेऊन हे पद अडवणे, हे लोकशाहीस धरून नाही," असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले. त्यांनी सरन्यायाधीशांकडेही आपली व्यथा मांडल्याचे सांगितले.

मीरा रोडमध्ये बुधवारी मनसेच्या नेतृत्वात मोर्चा काढण्यात आला होता. त्या मोर्चाला सुरुवातीला परवानगी नाकारण्यात आली होती. यावर मुख्यमंत्र्यांनी पोलिस आयुक्तांबद्दल नाराजी व्यक्त केली. याबाबत उद्धव ठाकरेंना विचारले असता, हा सर्व प्रकार संतापजनक आहे. मीरा भाईंदरची मराठी माणसांच्या मनात अनेक वर्षांपासून राग खदखदतोय, सकाळी लोकलमधून येताना आम्हाला विचित्र प्रकारची दादागिरी सहन करावी लागते, असे काही लोक मला सांगतात. असंतोषाचा स्फोट झाला, तर त्याला सरकार जबाबदार असेल. केवळ आयुक्तांच्या माथ्यावर खापर फोडून चालणार नाही. मुख्यमंत्री, गृहमंत्र्यांची देखील ती जबाबदारी आहे. सर्व राज्याची काळजी घ्यायला पाहिजे. कोणतीही भाषिक दादागिरी आमच्यावर होता कामा नये, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

शिवसेनेने मराठी माणसासाठी काय केले? असा प्रश्न आमच्याबाबत विचारला जातो. माझे सरकार पाडले नसते, तर मी गिरणी कामगारांना, सरकारी कर्मचाऱ्यांना आणि पोलिसांना सुद्धा मुंबईत घरे दिली असती. आजही आमची हीच मागणी आहे, असे उद्धव ठाकरे म्हणालेत. मराठीचा मुद्दा आता गरम झालेलाच आहे. केवळ हिंदी सक्तीच्या जीआरचा विरोध करून चालणार नाही. तो जीआर काढणाऱ्यांचा, हिंदी सक्ती लादणाऱ्यांचा आपण विरोध केला पाहिजे. मराठी माणूस आता एकवटलेला आहेत. आमचे पुन्हा पुन्हा तेच सांगणे आहे की, आमचा कोणत्या भाषेला विरोध नाही, पण सक्तीला विरोध आहे, असे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत शिक्षकांच्या आंदोलनावर भाष्य करताना यासाठी महाविकास आघाडी सरकार जबाबदार असल्याचे म्हटले आहे. यावर बोलताना, आता तुम्ही आहात, तर तुम्ही शिक्षकांना न्याय का देत नाहीत? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला. नशीब शिक्षकांच्या प्रश्नाला नेहरू जबाबदार आहेत, असे ते म्हणाले नाहीत. नेहरूंमुळे शिक्षकांना विनाअनुदानित रहावे लागले, असे देखील बोलायला ते कमी करणार नाही. असा टोलाही उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांना लगावला. अडीच वर्षांपासून ते सत्तेत आहेत. महाविकास आघाडी देखील ते सत्तेत होते. आताही तेच सत्तेत आहेत. आम्ही नाही करू शकलो, तर तुम्ही करा, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी यावेळी विरोधीपक्ष नेते पदाबाबतही प्रतिक्रिया दिली. मी काल सरन्यायाधीशांना देखील आमची व्यथा सांगितली आहे. त्यामुळे पुढे काय होते बघुया. आपल्या देशात बऱ्याचवेळेला अल्पमतातील सरकार चालते. पण विरोधीपक्ष नेतेपदासाठी अडवणूक केली जाते, हे विचित्र आहे. हे सुदृढ लोकशाहीचे लक्षण नाहीये. गुजरातचे इंद्रकुमार यांच्या पक्षाचे संख्याबळ कमी असताना देखील ते पंतप्रधान झाले होते. चंद्रशेखर, देवेगौडा अशी अनेक उदाहरणे आहेत. अल्पमताच्या पक्षाचा माणूस पंतप्रधान होऊ शकतो. पण पुरेसे संख्याबळ नसल्याचे कारण सांगून विरोधीपक्ष नेते पद कसे का अडवू शकता? असा सवालही उद्धव ठाकरे यांनी केला. विरोधीपक्ष नेता हा सुदृढ लोकशाहीतील अत्यावश्यक घटक आहे. मस्तवालपणे वागणाऱ्या लोकप्रतिनिधींवर अंकुश ठेवण्यासाठी विरोधीपक्ष नेता हा पाहिजेच, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १० जुलै २०२५

# नवीन पिढीसाठी संगणक साक्षर असणे काळाची गरज - संदीप पाटील




**मुरूम, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** केसरजवळगा, ता. उमरगा येथील जि. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत नवीन संगणक कक्षाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष संदीप पाटील, उपाध्यक्ष अजीज शेख, मुख्याध्यापक श्रीकांत जवळेकर यांच्या हस्ते बुधवारी (ता. ९) रोजी करण्यात आले. शाळेला जिल्हा परिषदेमार्फत सात संगणक प्राप्त झाले होते. सदर संगणक कक्ष सर्व सोयीने युक्त असल्याने मुलांना नवनवीन बाबी शिकण्यासाठी सोयीचे होणार आहे. सध्याचे युग हे संगणकाचे असल्याने प्राथमिक शाळेतच आता हे शिकण्यास मिळत असल्याने मुलांना याचा नक्कीच फायदा होईल. नवीन पिढीसाठी संगणक साक्षर असणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप पाटील यांनी केले. गावाची शाळा बदलत असल्याचे पाहून शाळेसाठी जे-जे हवे ते सहकार्य करू, अशी ग्वाही उपाध्यक्ष अजीज शेख यांनी दिली. ग्राम पंचायतकडून शाळेला क्रीडा साहित्याची यादी द्यावी व तात्काळ सर्व क्रीडा साहित्य देण्याचे आश्वासन माजी सरपंच व विद्यमान सदस्य अमोल पटवारी यांनी दिली. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य बालाजी डिगोळे, जयपालसिंग राजपूत, गैबूशा मकानदार, पालक व सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बालाजी भोसले तर आभार अजीज शेख यांनी मानले.

# "पक्षी जाय दिगंतरा" - अरण्यऋषींच्या साहित्याला भावपूर्ण अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर :** जीवन विकास ग्रंथालयाच्या ग्रंथमित्र भा. बा. आर्वीकर सभागृहात "पक्षी जाय दिगंतरा" या अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या साहित्याला समर्पित कार्यक्रमाचा एक आगळावेगळा आणि भावस्पर्शी अनुभव रसिक प्रेक्षकांनी घेतला. हा कार्यक्रम अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या साहित्यस्मृती जागवणारा अभिवादन कार्यक्रम ठरला.निसर्गप्रेम आणि साहित्य यांची सुंदर सांगड घालत, चितमपल्लींच्या लेखनातील पानांची सळसळ, पक्ष्यांचा किलबिलाट आणि जंगलातील नीरव शांततेची अनुभूती उपस्थितांना मिळाली.जीवन विकास ग्रंथालयातर्फे आयोजित या कार्यक्रमात दीपाली कुलकर्णी, नीता पानसरे-वाळवेकर यांनी चीतमपल्ली यांच्या निवडक साहित्यकृतींचं ओघवत्या शैलीत वाचन केलं. या वाचनाला माधवी थत्ते (सतार) आणि निरंजन भालेराव (बासरी) यांच्या सजीव वादनाची सुरेल साथ लाभली.कार्यक्रमात उपस्थित साहित्यप्रेमींना आणि निसर्गप्रेमींना अरण्यऋषींच्या विचारसंपत्तीचा नव्याने परिचय झाला. "पक्षी जाय दिगंतरा" हे केवळ एक अभिवाचन नव्हतं, तर ते एका कालातीत व्यक्तिमत्त्वाच्या स्मृतींचं जिवंत रूप होतं.कार्यक्रमाच्या प्रारंभी कार्यवाह डॉ. राजशेखर बालेकर आणि सौ. संगिता मंडलिक यांनी सहभागी व्यक्तींचे ग्रंथभेट देऊन स्वागत केले. प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन श्रीकांत उमरीकर यांनी केले.

# स्व. कैलास नागरे यांच्या पत्नीचा निवेदनाव्दारे प्रशासनाला १२ दिवसाचा अल्टिमेटम, अन्यथा अन्नत्याग आंदोलन



**देऊळगाव राजा - (महेश मुंढे) :** महाराष्ट्र शासन युवा शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकरी स्वर्गीय कैलास अर्जुन नागरे रा.शिवणी आरमाळ यांनी शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळावे म्हणून दिनांक १३ मार्च २०२५ रोजी बलिदान दिले आज त्याला चार महिने पूर्ण झाली तरी त्यांच्या कुटुंबाला न्याय नाही त्यांच्या सुसाईड नोटमध्ये केलेला उल्लेख की माझ्या मुलांचं व कुटुंबाचे पालकत्व मुख्यमंत्र्यांनी व उपमुख्यमंत्र्यांनी स्वीकारावे आणि ते मुख्यमंत्री साहेबांनी विधानसभेमध्ये स्वीकारल्याची घोषणा केली,पण त्यांच पुढे काय झालं ते अद्याप काहीच आम्हाला कळालं नाही म्हणून आज उपविभागीय कार्यालय सिंदखेड राजा तहसील कार्यालय देऊळगाव राजा येथे निवेदन देऊन अन्नत्याग आमरण उपोषण करणार असल्याची घोषणाच केली,निवेदनाद्वारे विनंती केली मला १२ दिवसाच्या आत आपल्या स्तरावर माननीय मुख्यमंत्री साहेबांची भेटीची वेळ शासकीय प्रशासकीय यंत्रणेनुसार मिळावी कारण माननीय मुख्यमंत्री साहेबांनी माझ्या कुटुंबाचे पालकत्व स्वीकारले आहे त्याचे पुढे काय झाले अद्याप काहीच माहिती मला मिळाली नाही यासाठी म्हणजे सगळ्या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात येईल आणि मला व माझ्या मुलांना न्याय मिळेल याकरिता मी आपल्याकडे निवेदनाद्वारे ही वेळ मागत आहे ज्यावेळेस स्वर्गीय कैलास नागरे यांच्या अंत्यविधीसाठी व रक्षाविसर्जनासाठी सर्वच राजकीय पक्षातील पालकमंत्री साहेब व तसेच विविध सामाजिक राजकीय संघटनेने सर्व शेतकरी संघटना यांनी भेट दिली आणि अनेक राजकीय क्षेत्रातील संघटनेने मुलांच्या शिक्षणाची ,आरोग्याची सगळी जबाबदारी उचलली पण ती सत्यात उतरली नाही म्हणून खंत व्यक्ती केली, तसेच शासकीय प्रशासनाने सुद्धा सर्वांनी येऊन मला भेट दिली सर्वांनी आश्वासन दिले पण आश्वासन पूर्ण झालेच नाही माझ्या पतीचे जे बलिदान झाले ती केवळ फक्त प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे झाले प्रशासनाने त्यांच्या निवेदनाची व आंदोलनाची दखल जर घेतली असती तर ही वेळ माझ्यावर माझ्या मुलांवर आली नसती आज मला न्याय मागण्यासाठी जर मला सुद्धा अन्नत्याग आमरण उपोषण करण्याची वेळ येत असेल तर युवा शेतकरी पुरस्कार स्वर्गीय कैलास नागरे यांच्या पत्नी म्हणून मी तेही सुद्धा आंदोलन करायला तयार आहे परत राज्य सरकारला बलिदान घ्यायचे का? जर बलिदान घेऊन न्याय मिळत असेल तर त्याही सुद्धा प्रक्रियेला मी समोरे जावा असं सरकारला जर वाटत असेल तर ?याची सर्व जबाबदारी ही राज्य सरकारची असेल म्हणून अजून वेळ गेली नाही म्हणून सध्या अधिवेशन चालू आहे आणि अधिवेशनामध्ये माझ्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी व पालकत्वाची जबाबदारी ही राज्य सरकारने अधिवेशनात मांडावी आणि मला न्याय द्यावा, नाहीतर या सर्व विषयावर चर्चा करण्यासाठी आपण मला १२ दिवसाच्या आत वेळ द्यावा हीच राज्य सरकारकडे युवा शेतकरी पुरस्कार कैलास नागरे यांची पत्नी म्हणून मी या राज्य सरकारकडे हात जोडून विनंती करीते असल्याचे निवेदनामध्ये उल्लेख आहे. मला व माझ्या मुलांच्या भविष्यासाठी तरी वेळ द्या नाहीतर मी माझ्या राहत्या घरी शिवणी आरमाळ येथे श्रीमती स्वाती नागरे माझ्या पतीच्या प्रतिमे जवळ अन्नत्याग आमरण उपोषण दिनांक २१ जुलै २०२५ पासून करणार आहे.माझ्या व माझ्या कुटुंबाच्या आरोग्याची सर्व जबाबदारी ही प्रशासनाची असेल जर बलिदान देऊन न्याय मिळत असेल तर तेही सुद्धा मी करायला तयार आहे कारण उदाहरण, माझ्या पतीने बलिदान दिल्यानंतर शिवनी आरमाळ येथील धरणावरील सर्व झाडं झुडपे काढण्यात आले तेही बलिदान दिल्यानंतरच काढण्यात आली म्हणून राज्य सरकारने माझ्यावर ती वेळ येणार नाही याची खबरदारी घ्यावी असे आव्हान श्रीमती स्वाती नागरे यांनी केली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १० जुलै २०२५


## राजमाता जिजाऊ आश्रम शाळेत विद्यार्थी संसद निवडणुका पार पडल्या



**खुलताबाद :** लोकशाही पद्धतीने देशाचा कारभार कसा चालतो हे मुलांनी प्रत्यक्ष अनुभवले.या निवडणूकासाठी उमेदवारांना प्रचारासाठी ४ दिवस देण्यात आले. या निवडणुकीची प्रक्रिया मुलांनी स्वतः पार पाडली. इच्छुक उमेदवार २४ विद्यार्थी रिंगणात उभे होते,त्यापैकी १२ उमेदवार निवडले गेले. अत्यंत चुरशीच्या झालेल्या निवडणुकीत शाळेचे वातावरण निवडणुकी सारखेच झाले याचाही अनुभव मुलांनी घेतला व या निवडणुकीचा निकाल शनिवारी ५ तारखेला जाहीर झाला.सोमवारी शपथविधी संपन्न झाला.यातून जबाबदारीची जाणीव व निवडणूक प्रकिया अनुभवता आली. या निवडनुकुसाठी शाळेच्या अध्यक्षा छायाताई जंगले मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. संदीप चोपडे, प्राथमिक विभाग मुख्याध्यापक विजयसिंग ठाकूर, देशमुख सर, चव्हाण सर, पवार सर, लोंढे मॅडम, पाटील मॅडम,डी.एन.पाटील सर, आर.एस. पाटीलसर, वी.एम. राठोडसर, आरखे सर, तांगडे सर, चोंधे सर, भोये सर, सचिन पाटील सर, काळे सर तसेच अधीक्षक भारत राठोड सर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


# राज्यातील हॉटेल उद्योग धोक्याच्या उंबरठ्यावर




**मुंबई :** महाराष्ट्रातील हॉटेल आणि रेस्टॉरंट उद्योगावर आज भीषण आर्थिक संकट ओढावलं असून, दिवसेंदिवस वाढणारे कर आणि शासनाचे कठोर निर्णय, यामुळे हा उद्योग अक्षरशः कोलमडण्याच्या मार्गावर आहे, अशी गंभीर चिंता भारतीय हॉटेल व रेस्टॉरंट संघटना (आहार AHAR) ने व्यक्त केली आहे.

अवघ्या एका वर्षाच्या कालावधीत उद्योगाला सलग आर्थिक हादरे सहन करावे लागले आहेत. मद्यावरील मूल्यवर्धित कर (व्हॅट) ५% वरून १०% इतका वाढविण्यात आला. त्यानंतर आर्थिक वर्ष २०२५ - २६ साठी परवाना शुल्कात १५% इतकी वाढ करण्यात आली. आता राज्य सरकारने मद्यावरील उत्पादन शुल्कात थेट ६०% इतकी प्रचंड वाढ केली आहे. हे तिन्ही निर्णय एकत्रितपणे पाहता, कोरोनानंतर सावरत असलेला हा व्यवसाय परत कोसळण्याच्या मार्गावर आहे. या निर्णयांना "अन्यायकारक कर वाढीला त्सुनामी" असे संबोधत आहारने इशारा दिला आहे की अशा पद्धतीचे धोरण हॉटेल आणि रेस्टॉरंट उद्योगाचे अस्तित्वच धोक्यात आणत आहे. या सर्व वाढीचा भार ग्राहकांवर टाकला जात असल्यामुळे सेवा महाग झाल्या आहेत, परिणामी ग्राहक मागणी कमी होत असून ही स्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे.

आहारचे अध्यक्ष सुधाकर शेट्टी म्हणाले, "हे केवळ आर्थिक आघात नाही, तर संपूर्ण उद्योगासाठी धोक्याची घंटा आहे. रोजगार निर्माण करणाऱ्या आणि शासनाला मोठ्या प्रमाणात कर भरणाऱ्या या उद्योगासाठी हे निर्णय 'अंत्यघटिका' ठरत आहेत. आमच्या संघटनेचे सदस्य साशंक आहेत आणि उद्याचा दिवस कसा उजाडेल, याबाबतही खात्री नाही. उत्पादन शुल्क नूतनीकरणाच्या दरात वाढ, व्हॅट आणि उत्पादन शुल्कातही अनियंत्रित वाढ यामुळे आमच्या अस्तित्वालाच प्रश्न निर्माण झाला आहे. आम्ही सरकारला विनंती करतो की, अशा एकतर्फी निर्णयांऐवजी उद्योगाशी संवाद साधून त्वरित हे निर्णय मागे घ्यावेत."

आहार संघटनेने स्पष्ट केले की या अन्यायकारक करवाढीचे दूरगामी परिणाम होणार आहेत. महाराष्ट्रातील हॉटेल आणि रेस्टॉरंट उद्योगात सध्या १९,००० पेक्षा जास्त परवानाधारक बार व लाउंज आहेत आणि हा आकडा दरवर्षी ८% च्या दराने वाढतो आहे. या क्षेत्रात थेट ४ लाखांहून अधिक लोक रोजगारात आहेत, तसेच सुमारे ४८,००० पुरवठादार या उद्योगावर अवलंबून आहेत. याशिवाय, अंदाजे १८ लाख लोक अप्रत्यक्षरीत्या या उद्योगाशी जोडले गेलेले आहेत.

शासनाच्या या करवाढीमुळे सीमावर्ती राज्यांतून मद्याची अवैध वाहतूक वाढण्याची भीती आहे. परिणामी करचोरी व भ्रष्टाचारासह गुन्हेगारी वाढण्याचा धोका आहे. एवढ्या मोठ्या उद्योगसमूहावर असे आर्थिक ओझे टाकल्यास व्यवसाय, रोजगार, पुरवठा साखळी आणि ग्राहक विश्वास या साऱ्यावरच परिणाम होणार आहे. जेव्हा पंतप्रधान कार्यालय आणि जागतिक बँक मिळून मुंबईला भारतातील प्रमुख पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्याच्या दिशेने काम करत असतानाच ही करवाढ अशी वेळ निवडून करण्यात आली आहे. मात्र सरकारच्या या निर्णयामुळे याच उद्दिष्टांना मोठा धक्का बसणार आहे. याच पद्धतीने धोरण अवलंबल्यास देशांतर्गत असोत वा आंतरराष्ट्रीय पर्यटक हे महाराष्ट्राऐवजी अधिक स्वस्त राज्यांकडे वळतील आणि परिणामी महाराष्ट्रात पर्यटकांची संख्या, व्यावसायिक घडामोडी, आणि राज्याच्या महसुलात घट होणार आहे.

तसेच यावेळी आहारने नमूद केले की, त्यांच्या सर्व सदस्यांमध्ये शासनाच्या या निर्णयांविषयी तीव्र नाराजी आहे. अनेक सदस्यांनी ही वाढ सहन करून व्यवसाय चालवणे अशक्य असल्याचे सांगितले आहे. सरकारने उद्योजकांच्या मतांचा विचार न करता हे धोरण लागू केल्यामुळे संताप पसरला आहे. शासनाने हे निर्णय त्वरित मागे घ्यावेत आणि कोणताही पुढील बदल करण्याआधी या क्षेत्राशी चर्चा करावी, अशी संघटनेची मागणी आहे.

हॉटेल आणि रेस्टॉरंट उद्योग हे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. शहरी जीवनात गतिमानता, सांस्कृतिक ओळख आणि पर्यटनवृद्धी यामध्येही या क्षेत्राचा मोलाचा वाटा आहे. आहार संघटना आपल्या सर्व सदस्यांचे हित जोपासण्यासाठी आणि या क्षेत्राला योग्य सन्मान व पाठबळ मिळावे यासाठी दृढपणे वचनबद्ध असल्याचेही यावेळी संघटनेकडून स्पष्ट करण्यात आले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १० जुलै २०२५


# गुरू पौर्णिमा : भारतीय संस्कृतीतील ज्ञानाचा उत्सव



गुरू हे जीवनाच्या प्रत्येक वळणावर दिव्य प्रकाश देतात. त्यांच्या शिकवणुकीचा गाभा हेच असतो की आपण सन्मार्गी, सजग आणि सुसंस्कृत बनावे. गुरू पौर्णिमा आपल्याला त्या स्मृतींचे आणि संस्कारांचे स्मरण करून देते. त्यामुळे हा दिवस हा केवळ एक दिवस नसून, तो जीवनातील प्रत्येक क्षणात गुरूच्या शिकवणीचा जागर करण्याचा दिवस आहे.

**गुरू पौर्णिमेचा इतिहास** भारतीय संस्कृती ही ऋषिमुनी, ग्रंथ, परंपरा, व्रते आणि सणांनी समृद्ध आहे. यात "गुरू पौर्णिमा" हा एक असा पवित्र दिवस आहे जो केवळ एक सण नसून ज्ञान, नम्रता आणि कृतज्ञतेचे प्रतीक आहे. गुरू पौर्णिमा हा दिवस आपल्या जीवनातील गुरू – शिक्षक, मार्गदर्शक, आई-वडील, आध्यात्मिक गुरू, समाजशिक्षक, तसेच आचारधर्म शिकवणारे सर्व – यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा असतो.

गुरू पौर्णिमेचे मूळ अतिशय प्राचीन आहे. हा दिवस आषाढ महिन्यातील पौर्णिमेला साजरा केला जातो. या दिवशी महर्षी व्यासांचा जन्म झाला, म्हणून हा दिवस "व्यास पौर्णिमा" म्हणूनही ओळखला जातो. महर्षी व्यास यांनी वेदांचे संकलन, महाभारताचे लेखन आणि श्रीमद्भागवतासारखे अनेक महत्त्वाचे ग्रंथ लिहिले. त्यामुळे त्यांना आदिगुरू मानले जाते. "गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।

गुरुः साक्षात परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः॥"

या श्लोकात गुरूला ब्रह्मा, विष्णू, महेश आणि परब्रह्म समजले गेले आहे. त्यामुळे गुरूचे स्थान अत्युच्च आहे. **गुरू शिष्य परंपरेचे महत्व** भारतीय संस्कृतीत गुरूशिष्य परंपरेला फार मोठे महत्त्व आहे. प्राचीन काळात विद्यार्थी आश्रमात जाऊन गुरूच्या सान्निध्यात शिक्षण घेत. गुरूकुल ही केवळ शैक्षणिक संस्था नव्हती, ती जीवनशिक्षणाचे केंद्र होती. गुरू केवळ ज्ञान देणारा नव्हे, तर मूल्यांची शिकवण देणारा होता. अर्जुन-संधिपर्वात श्रीकृष्ण आणि अर्जुन यांचे संबंध, रामायणात वसिष्ठ आणि राम यांचे नातं, एकलव्याच्या कथेमधून गुरूभक्तीचे उदाहरण ही सर्व या परंपरेचे प्रतीक आहेत. गुरू पौर्णिमेचे धार्मिक आणि अध्यात्मिक स्वरूप गुरू पौर्णिमा केवळ शैक्षणिक दृष्टिकोनातूनच नव्हे तर धार्मिक आणि अध्यात्मिक दृष्टीनेही खूप महत्त्वाची आहे. विशेषतः योग आणि साधनेच्या क्षेत्रात या दिवसाचे विशेष महत्त्व आहे. योगसाधक या दिवशी आपल्या गुरूंना वंदन करून नवीन संकल्प करतात. बौद्ध धर्मात हा दिवस गौतम बुद्धांनी आपले पहिले उपदेश सारनाथ येथे दिला, म्हणूनही महत्त्वाचा मानला जातो.

हिंदू धर्मात विविध मठ, आश्रम, मंदिरांमध्ये गुरूच्या पूजनाचे आणि प्रवचनाचे कार्यक्रम होतात. साधक या दिवशी उपवास करून, ध्यानधारणा करून आत्मशुद्धीचा संकल्प करतात. **गुरू पौर्णिमेचे धार्मिक आणि अध्यात्मिक स्वरूप शैक्षणिक क्षेत्रातील गुरूचे महत्त्व** गुरू हा केवळ आध्यात्मिक गुरू नसतो, तर शिक्षक, प्राध्यापक, मार्गदर्शक या स्वरूपात देखील असतो. जीवनातील योग्य दिशा दाखवणारा प्रत्येकजण गुरू होतो. शिक्षणशास्त्रात म्हटलं आहे – "Teacher is a nation builder".

गुरू पौर्णिमेच्या दिवशी शाळा, महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये विशेष कार्यक्रम घेतले जातात. विद्यार्थी आपल्या शिक्षकांना फुले, भेटवस्तू देतात. त्यांचे चरणस्पर्श करतात आणि आशीर्वाद घेतात. अनेक ठिकाणी वक्तृत्व, निबंध, काव्यवाचन, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजिले जातात. **आधुनिक काळात गुरू पौर्णिमेचे स्वरूप** तंत्रज्ञानाच्या युगात जरी गुरू-शिष्य यांचे शारीरिक अंतर वाढले असले, तरी गुरूंचे स्थान आजही अढळ आहे. ऑनलाईन शिक्षण, डिजिटल क्लासेस, वेबिनार्स यामुळे शिक्षणप्रक्रिया बदलली असली, तरी आजही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांची गरज आहेच.

गुरू पौर्णिमा हे डिजिटल माध्यमातही साजरी केली जाते – ऑनलाईन शुभेच्छा, व्हिडिओ कॉलद्वारे गुरूंना अभिवादन, सोशल मिडियावर संदेश शेअर करणे अशा विविध माध्यमातून हा दिवस साजरा होतो. **गुरू पौर्णिमा आणि कुटुंब** प्रत्येकाच्या आयुष्यातील पहिले गुरू म्हणजे आपले पालक. आई ही पहिली शिक्षिका आणि वडील हे पहिले मार्गदर्शक असतात. मुलांना बोलायला शिकवणे, चालायला शिकवणे, संस्कार देणे हे सर्व पालक करतात. म्हणून गुरू पौर्णिमेच्या दिवशी आई-वडिलांचे देखील आभार मानणे गरजेचे आहे. **गुरूंच्या विविध भूमिका** गुरू ही संकल्पना अनेक पातळ्यांवर कार्यरत असते: आध्यात्मिक गुरू – आत्मसाक्षात्कार घडवणारे. शैक्षणिक गुरू – ज्ञान देणारे. कौटुंबिक गुरू – जीवनमूल्य शिकवणारे. सामाजिक गुरू – समाजहिताची दिशा देणारे. राजकीय गुरू – जनतेसाठी नितीमूल्य टिकवणारे. कलात्मक गुरू – संगीत, चित्रकला, नाट्य, साहित्य शिकवणारे. **गुरू पौर्णिमेच्या दिवशी काय करावे?** गुरूंचे चरणस्पर्श करून त्यांचे आशीर्वाद घ्यावेत. उपवास करून शुद्ध मनाने गुरूंचे स्मरण करावे. गुरूंना भेटवस्तू, पुस्तके, कपडे किंवा इतर उपयोगी वस्तू द्याव्यात. गुरूंच्या शिकवणीचा आभारी राहून त्यांच्या कार्याची प्रशंसा करावी. स्वतःच्या जीवनात त्यांचे मार्गदर्शन अमलात आणावे. गुरू पौर्णिमा म्हणजे कृतज्ञतेचा महोत्सव आजच्या धावपळीच्या जीवनात आपल्या जीवनातील गुरूंबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा एक सुंदर प्रसंग आहे. गुरू हा दिव्य शक्तीचा स्रोत आहे. त्यांच्या आशीर्वादाशिवाय जीवन पूर्ण होऊ शकत नाही. "गुरू पौर्णिमा" हा दिवस म्हणजे आपल्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला मार्गदर्शन करणाऱ्यांप्रती मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करण्याचा सोहळा आहे.


**श्रीमती सरला कामे- कुमावत**

9403406373


# व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाची बिनविरोध निवड




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** शहर व परिसरात विश्वासार्हतेचा लौकिक कमावलेल्या व्यापारी नागरी सहकारी म. पतसंस्थेच्या संचालक मंडळाची बिनविरोध निवड मोठ्या उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात मंगळवारी (ता. ८ ) रोजी पार पडली १९९५ पासून सुरू असलेल्या बिनविरोध निवडीच्या परंपरेला यंदाही कायम ठेवत संस्थेच्या सभासदांनी एकतेचा परिचय दिला. यावेळी अध्यक्षपदी उमेश कारभारी, उपाध्यक्ष अशोक चव्हाण तर सचिव श्रीकांत मिणियार यांची निवड करण्यात आली. संचालक मंडळात शशिकांत बाबशेट्टी, अंबाजी बिराजदार, सुरेश रणसुरे, प्रवीण सोलापुरे, दत्तात्रय गिरीबा, महानंदा ख्याडे, प्रेमा झंवर यांची संचालक म्हणून निवड करण्यात आली. नवनिर्वाचित संचालकांचे व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेच्या सर्व सभासद, शहर व परिसरातील नागरिकांनी हार्दिक अभिनंदन केले. याप्रसंगी श्रीकांत मिणियार म्हणाले की, व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेचा मुख्य उद्देश सभासदांसह व्यापाऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे. सभासदांचा विश्वास व पारदर्शक कारभारामुळे भविष्यात संस्थेच्या माध्यमातून अधिकाधिक कर्ज उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. व्यापाऱ्यांना विविध सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यावर संचालक मंडळ कटिबद्ध राहील. सभासदांनी दाखवलेल्या विश्वासाचे आम्ही नेहमी ऋणी आहोत. हा खंबीर विश्वास पाठीशी घेऊन संस्था अधिक प्रगतीपथावर नेण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन त्यांनी शेवटी दिले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी व्ही. एम. कातपुरे यांनी पारदर्शकपणे जबाबदारी सांभाळली. सिद्रामप्पा तूगावे, राजकुमार स्वामी, मनोज व्हसाकले, संजय टिकांबरे, आर. व्ही. स्वामी आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिद्धू स्वामी यांनी केले. सूत्रसंचालन राजकुमार स्वामी तर आभार मेघराज धुमुरे यांनी मानले. यावेळी बहुसंख्येने सभासद, पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १० जुलै २०२५

## मासिक पाळीच्या संशयातून विद्यार्थिनींची विवस्त्र करून तपासणी



**ठाणे :** शहापूरमधील एका खासगी शाळेत धक्कादायक प्रकार घडला आहे. स्वच्छता गृहात मासिक पाळीचे रक्त सांडल्यामुळे इयत्ता सहावी ते दहावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थिनींची शाळेने तपासणी केल्याचा आरोप पालकांनी केला आहे. धक्कादायक म्हणजे सर्व मुलींच्या अंगावरचे कपडे काढून शाळेतील शिक्षकांनी तपासणी करण्याचे लज्जास्पद कृत्य केले. तसेच सर्व मुलींचे फिंगर प्रिंट सुद्धा शाळा प्रशासनाने घेतल्याचे पालकांनी म्हटले आहे. या प्रकारामुळे पालकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. याप्रकरणी मुख्याध्यापिका, ट्रस्टीसह ८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शहापूरमधील आर. एस. दमानी इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या टॉयलेटमध्ये रक्ताचे डाग आढळल्यानंतर शाळा प्रशासनाने १४ ते १५ वयोगटातील सुमारे १० ते १२ विद्यार्थिनींना संशयाच्या आधारे जबरदस्तीने अंगावरील सगळे कपडे काढण्यास भाग पाडून तपासणी केली. हा प्रकार शाळेतील मुख्याध्यापिकेच्या उपस्थितीत झाला असल्याची माहिती समोर आली आहे.

घटनेची माहिती मिळताच संतप्त पालकांनी शाळेत धाव घेत, संबंधित प्रकाराबाबत जाब विचारला. शाळेच्या शिक्षकांनी विद्यार्थिनींना मासिक पाळी या नैसर्गिक प्रक्रियेबाबत योग्य समज देण्याऐवजी त्यांच्यावर संशय घेत, सार्वजनिकरीत्या अपमानित केले, असा आरोप पालकांनी केला आहे. शाळेच्या इयत्ता ५ वी ते १० वीतील विद्यार्थिनींची याप्रकारे तपासणी केल्यामुळे त्या मानसिक धक्क्यात आहेत, असे पालकांचे म्हणणे आहे. शाळेच्या प्रशासनावर कडक कारवाई होईपर्यंत शांत बसणार नाही, अशी ठाम भूमिका पालकांनी घेतली आहे. त्यांनी पोलिसांत गुन्हा दाखल करून संबंधितांवर तात्काळ अटक करण्याची मागणी केली आहे.

या प्रकारामुळे काहीकाळ शाळेत पालक आणि शालेय प्रशासन यांच्यात गोंधळ झाला. सर्व पालक एकवटले असून त्यांनी आर. एस. दमानी स्कूलच्या प्रिन्सिपलांवर जोपर्यंत गुन्हा दाखल करून त्यांना अटक होत नाही, तोपर्यंत इथून हालणार नाही, अशी भूमिका घेतली होती. दरम्यान, याप्रकरणी मुख्याध्यापिका, दोन ट्रस्टी यांच्यासह ४ शिक्षिका आणि शिपाई यांच्यावर पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका नामांकित शाळेत मुलींना अशाप्रकारे विवस्त्र केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

# मराठी मोर्चाला परवानगी नाकारणे भोवले



**मुंबई :** मिरा भाईंदरमध्ये मराठी आणि अमराठी वादाच्या पार्श्वभूमीवर मराठी संघटनांनी आयोजित केलेल्या मोर्चाला पोलिसांनी परवानगी नाकारल्यामुळे राज्यात मोठा राजकीय वाद निर्माण झाला होता. मराठी मनसे, शिवसेना आणि मराठी एकीकरण समिती यांच्या संयुक्त मोर्चाला पोलिसांनी परवानगी नाकारल्याने राज्य सरकारवर टीकेची झोड उठली होती. या प्रकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने लक्ष घालत पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांची तडकाफडकी बदली केली आहे.

मिरा भाईंदर येथील मराठी मोर्चाला परवानगी नाकारण्याचा निर्णय केवळ प्रशासनिक नसून, मराठी अस्मितेला दाबण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. त्यामुळे सरकारची प्रतिमा मलिन होत असल्याचे लक्षात घेऊन मुख्यमंत्री फडणवीस यांनी याप्रकरणी चौकशीचे आदेश दिले होते. चौकशीचे आदेश दिल्यानंतर अवघ्या २४ तासांतच पांडे यांची उचलबांगडी करण्यात आली. त्यांच्या जागी आयपीएस अधिकारी निकेत कौशिक यांची मिरा भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागामार्फत ९ जुलै २०२५ रोजी जारी करण्यात आलेल्या शासन आदेशानुसार, भारतीय पोलिस सेवेतील (भा.पो.से.) दोन अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि पदस्थापना करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र पोलिस अधिनियम, १९५१ च्या कलम २२ न मधील तरतुदींनुसार हे बदल करण्यात आले आहेत. निकेत कौशिक, जे यापूर्वी अपर पोलिस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथे कार्यरत होते, त्यांची आता पोलिस आयुक्त, मिरा-भाईंदर-वसई-विरार म्हणून बदलीने पदस्थापना करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, मधुकर पांडे, जे मिरा-भाईंदर-वसई-विरारचे पोलिस आयुक्त म्हणून कार्यरत होते, त्यांची बदली करून त्यांना अपर पोलिस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई या पदावर नियुक्त करण्यात आले आहे.






महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १० जुलै २०२५

# आ. जितेंद्र आव्हाड यांना राष्ट्रवादीमध्ये मोठी जबाबदारी



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या माध्यमातून सातत्याने प्रश्न मांडणारे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर पक्षाने मोठी जबाबदारी सोपवली आहे. आव्हाड यांची पक्षाच्या मुख्य राष्ट्रीय प्रवक्ते पदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार आणि राष्ट्रीय कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांच्या मान्यतेने आव्हाड यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे पक्षाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अधिकृत हँडलवरून करण्यात आलेल्या पोस्टमध्ये ही माहिती देण्यात आली आहे. शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्या मान्यतेने पक्षाच्या मुख्य राष्ट्रीय प्रवक्ते पदी जितेंद्र आव्हाड यांची नियुक्ती करण्याची घोषणा या माध्यमातून करण्यात आली आहे. पक्षाची अधिकृत भूमिका जनतेसमोर मांडण्यासाठी आव्हाड यांचे निश्चित सहकार्य लाभेल, अशा अपेक्षा देखील यामध्ये व्यक्त करण्यात आली आहे.

या संदर्भात पक्षाच्या वतीने करण्यात आलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, 'नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय खासदार शरदचंद्रजी पवार साहेब तसेच राष्ट्रीय कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया ताई सुळे यांच्या मान्यतेने माननीय आमदार जितेंद्र आव्हाड यांची पक्षाच्या 'मुख्य राष्ट्रीय प्रवक्ते' पदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे विचार आणि ध्येयधोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि पक्षाची अधिकृत भूमिका जनतेसमोर मांडण्यासाठी जितेंद्र आव्हाड यांचे निश्चित सहकार्य लाभेल. आपल्या पुढील वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा!'

जितेंद्र आव्हाड यांनी देखील या संदर्भात पक्षाचे आभार व्यक्त केले आहे. पक्षाची भूमिका, तत्व आणि विचार जनतेपर्यंत पोहोचवण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या संदर्भात त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, 'पक्षाच्या "राष्ट्रीय प्रवक्तेपदाची" जबाबदारी देऊन माझ्यावर विश्वास दाखवणाऱ्या आदरणीय शरद पवार साहेब आणि आदरणीय सुप्रिया सुळे ताई यांचे मनःपूर्वक आभार. ही भूमिका पार पाडताना पक्षाची भूमिका, तत्त्वे आणि विचार जनतेपर्यंत प्रामाणिकपणे पोहोचवण्याचा प्रयत्न करीन.'

# डॉक्टरने भर रस्त्यात स्वत:ला पेटवून घेतले

**बुलढाणा :** कौटुंबिक कलहाला कंटाळून एका डॉक्टरने भररस्त्यात स्वत:ला पेटवून घेतल्याची भयंकर घटना बुलढाणा जिल्ह्यातील आलमपूर फाट्यावर घडली. उपस्थित नागरिकांनी धाडस दाखवून या व्यक्तीची आग विझवली. त्यानंतर त्या डॉक्टरला लगतच्या रुग्णालयात दाखल केले. तिथे त्यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, बुलढाण्याच्या नांदुरा तालुक्यात ही घटना घडली आहे. नांदुरा ते जळगाव जामोद मार्गावरील आलमपूर फाट्यावर आज नेहमीप्रमाणे प्रवाशी, प्रवाशी वाहतूक करणारी वाहने व फाट्यावरील लहान-सहान दुकानांत गजबज सुरू होती. या गजबजीत डॉक्टर चंदू पाटील नामक व्यक्तीने स्वत:वर ज्वालाग्राही द्रव्य पदार्थ ओतून पेटवून घेतले. या अचानक घडलेल्या प्रसंगाने सर्वजण स्तब्ध झाले. गजबजलेल्या फाट्यावर एक व्यक्ती उभा जळत असलेला पाहून लहान थोरांची भीतीने गाळण उडाली. पण त्यापैकी काहींनी तत्काळ त्या व्यक्तीच्या दिशेने धाव घेऊन त्याची आग विझवण्याचा प्रयत्न केला.

काहींनी त्याच्या अंगावर पाण्याचा मारा केला. पण तोपर्यंत तो व्यक्ती गंभीरपणे भाजला होता. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी भाजलेल्या व्यक्तीला तत्काळ खामगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना अकोला येथील रुग्णालयात हलवले. तिथे त्यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.

डॉक्टर चंदू पाटील हे जळगाव जामोद तालुक्यातील पिंपळगाव काळे येथील रहिवासी आहेत. ते पशुवैद्यकीय अधिकारी असल्याची माहिती आहेत. कौटुंबिक कलहातून त्यांनी स्वतःच्या अंगावर पेट्रोल टाकून त्यांनी जाळून घेतले. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाला आहे. त्यात चंदू पाटील वेदनांनी व्हिवळताना दिसून येत आहेत. त्यांच्या जवळ उभा असणारा व्यक्ती त्यांची आस्थेवाईकपणे विचारपूस करतानाही व्हिडिओत दिसून येत आहे.

# पाक अभिनेत्री हुमैरा असगरचा कुजलेला मृतदेह सापडला



पाकिस्तानी अभिनेत्री हुमैरा असगर हिचा मृतदेह पाकिस्तानातील कराची येथील एका अपार्टमेंटमध्ये आढळला आहे. 8 जुलै रोजी अभिनेत्रीचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळला. ती बराच काळ त्या अपार्टमेंटमध्ये एकटीच राहत होती. अभिनेत्रीचा पोस्टमॉर्टम रिपोर्ट अद्याप आलेला नाही. कराची पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

इंडिया टुडेच्या वृत्तानुसार, पाकिस्तानचे डीआयजी (उपमहानिरीक्षक) सय्यद असद रझा यांनी सांगितले की, त्यांना 8 जुलै रोजी दुपारी 3 वाजता या घटनेची माहिती मिळाली. अभिनेत्री हुमैरा असगर गेल्या 6-7 वर्षांपासून कराचीच्या इत्तेहाद कमर्शियल एरिया फेज 5 मध्ये एकटीच राहत होती. तिच्या अपार्टमेंटमधून शेजारी कुजण्याचा तीव्र वास येत होता. तसेच, ती गेल्या काही दिवसांपासून बाहेर आली नव्हती. परिस्थिती संशयास्पद वाटल्यानंतर, शेजाऱ्यांनी पोलिसांना फोन करून घटनेची माहिती दिली.

पोलिसांनी बराच वेळ दरवाजा ठोठावला, पण आतून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने पोलिसांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला. तिथे त्यांना अभिनेत्रीचा कुजलेला मृतदेह आढळला. पोलिसांचा असा विश्वास आहे की तिचा मृत्यू सुमारे 2 आठवड्यांपूर्वी झाला होता. अभिनेत्रीचा मृतदेह कराचीतील जिना पोस्ट ग्रॅज्युएट मेडिकल सेंटरमध्ये पाठवण्यात आला आहे.

वैद्यकीय केंद्राच्या डॉक्टर सुमैया सय्यद यांनी सांगितले आहे की मृतदेह इतका कुजला आहे की मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी वेळ लागू शकतो. दुसरीकडे, फॉरेन्सिक टीमने घराची कसून तपासणी केली आहे.

यासोबतच, कराची पोलिसांनी जनतेला आणि माध्यमांना पोस्टमॉर्टम रिपोर्ट येईपर्यंत कोणत्याही प्रकारच्या अफवा आणि अटकळ टाळण्याचे आवाहन केले आहे.

अभिनेत्री हुमैरा असगर हिचे वय सुमारे 32-35 वर्षे असल्याचे सांगितले जाते. तिने एक था बादशाह आणि जलेबी सारख्या लोकप्रिय पाकिस्तानी नाटकांचा भाग म्हणून काम केले आहे.

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903